**।। जय माऊली जय माऊली जय पुंडलीक माऊली ।।**

# परमहंस श्री.पुंडलीक बाबा



**पुंडलिका धाव लवकरी ।आपुल्या भक्ताला तारी ।।**

## आरती संग्रह

- **श्री.पुंडलीक देवाची आरती**
- **मुंगसाजी महाराजांची आरती**
- **आरती पुंडलिकाची**
- **पाळणा**
- येरे येरे भक्त वत्सला
- **श्री.मुंगसाजी देवाची आरती**
- **आरती श्री सद्‌गुरु राजाची**
- **आरती खंडुजी नानांची**
- **ओढ दर्शनाची**
- **पुंडलिका भेटी...**
- **श्री.बाबांची ओळख संतांच्या शब्दात....**

- **ओवी**
- **प्रार्थना**
- **नमस्कार**
- पुष्पांजली
- कर्पुरारती

## श्री.पुंडलीक देवाची आरती

**जय जय सदगुरु पुंडलिका । देई तव प्रेम प्रभो ।।धृ ।।**
**गोरेगांवी देही विदेही । ध्यानी मनी भगवान ।**
**मुंगसाजी सद्गुरु कृपेने । ब्रम्हास्वरुपी रममान ।।१।।**
**धन्य खंडुजी धन्य मंजुळा । संसारी गुणगाण**
**कुशी तयाच्या अवतरलाशी । सगुण रुप तव ध्यान ।।२ ।।**
**भक्त जना आधार तुझाची । कनवाळु गुरुराज ।**
**नाम तुझे मंगलमय गाता । रक्षण करशी लाज ।।३ ।।**
**थोर तुझा महिमा गुरुराया । सर्व सुखाचे धाम ।**
**अंत न लागे सामर्थ्याचा । व्यापक आत्माराम ।।४ ।।**
**सोडुनी या भावबंधन देई । तवचरणाची आस**
**ओवाळीतो आरती दयाळा । शरणागत प्रभूदास ।।५।।**

## मुंगसाजी महाराजांची आरती

**ओवाळू परमहंस मुंगसाजी राणा ।**
**आनंदी आनंद चरण देखोनी मना ।।धृ ।।**
**माथा जट भार कुरळे हेम वर्ण मुर्ति ।**
**चमके पायी पद्म सुंदरसावळी मुर्ती ।।१।।**
**स्वरुपाचे तेज न ये वर्णीता वाचे ।**
**देखीताची डोळा वेड लागले याचे ।।२।।**
**पुर्ण ब्रम्हा निर्विकारी आकार आला ।**
**निगमागमा थांग नसे करती गलबला ।।३।।**

Shri Pundlik Maharaj Prasann

ज्यांचे दर्शनी शिण गेला भागला ।
केले पुर्ण सुखी म्हणे दास घोगला ।।४।।

## आरती पुंडलिकाची

आरती पुंडलिकाची , स्वामीसद्‌गुरु समर्थाची
सदिच्छा नंदमुर्ति ,खेळे काटेपुर्णा तिरी
आरती पुंडलिकाची ।।धृ।।
गंगा निघे पायावरुनी , त्यासी भक्त घालतात पाणी
केस मोकळे करुनिया, ज्याने सृष्टी निर्माण केली
आरती पुंडलिकाची ।।धृ।।
ब्रम्हाधीका सांगे ज्ञान,योगी चौरंगा बसुन
गुज-गुज शब्द बोलती, पुंडलीक डोकावती मान
आरती पुंडलिकाची ।।धृ।।
मेरु धरिला पृथ्वीवरी, त्याला न्हानती दरबारी
ऐसे हे कौतुक , धन्य देवा पुंडलीक
आरती पुंडलिकाची ।।धृ।।
ब्रम्हांडाचा , सुत्रधारी , भक्त हालवतात दोरी
लिला दावि पुंडलिक नाथ , अभिमान दास शरणांगत
आरती पुंडलिकाची ।।धृ।।

## पाळणा

गोरेगांवी काटेपुर्णाच्या तिरी । भक्त रक्षण्या आला भुवरी
गोकुळीचा शाम कृष्ण मुरारी । धनगर वंशी आला श्रीहरी ।।
जो जो रे बाळा जो ।।१।।
रोहिणी नक्षत्र अंती खुलले । चैत्र मासाचे दिन पातले
शुध्द पंचमी तेज फाकले चंद्र । चांदणे आकाशी डोले
जो जो रे बाळा जो ।।२।।
एप्रील दहा रविवार जान । एकोणविसशे बत्तीस हा सन
मंजुळा मातेचे गर्भाचे मान । नऊ मास नऊ दिन झाले संपूर्ण
जो जो रे बाळा जो ।।३।।

Shri Pundlik Maharaj Prasann

मातेच्या पोटी बाळ जन्मला। खंडूजी पित्यास आनंदा झाला
पुत्र प्राप्तीचा केला सोहळा । सुहासिनीचा झाला तो मेळा
जो जो रे बाळा जो ।।४।।
पांच दिवस गेलीया वरी । बारस्याची मग केली तैयारी
पाळण्यात खेळे लाडका हरि । पुंडलिक नाम शोभे भूवरी
जो जो रे बाळा जो ।।५।।
खेळ खेळीता दिन लोटले । सात वर्षे बाळ नाही बोलले
माता पिता मग हताश झाले । बाळाकडे सारे चित्त लागले
जो जो रे बाळा जो ।।६।।
वेडया पिशाचे सोंग घेतले । नाचत हासत रस्त्याने चाले
पुंडलिकाच्या मग मनात आले । गोविंद राधे मुखाने बोले
जो जो रे बाळा जो ।।७।।
गटार गंगेत बसे जाऊन । घाण अंगाची येई दुरुन
ओळखेना कोणी देवा भगवान । पिसा म्हणूनी मारती जन
जो जो रे बाळा जो ।।८।।
रडणे त्याला नसे माहित । चक्रपाणी सदा राही हसत ।
नरनारी मात्या पित्या सांगत । तुमचा पुंडलिक खोड्या करीत
जो जो रे बाळा जो ।।९।।
धन्य पुंडलिका नवल केले । जिवंत नागाला हाती धरले
हाती धरुनी मुखी चावले । मातेचे तेव्हां ध्यान लागले
जो जो रे बाळा जो ।।१०।।
मग मातेने टाहो फोडीला । ग्राम जनांचा जमाव झाला
सर्प एकाएकी गुप्त तो झाला । अशी पुंडलिका अगाध लिला
जो जो रे बाळा जो ।।११।।
अवलियाने केली ही मात । आईबापाच्या आले ध्यानात
घेऊनिया गेले धामणगांवात । मुंगसाजी म्हणे हा देव साक्षात
जो जो रे बाळा जो ।।१२।।
यात्रा भरली गोरेगांवात । अठ्ठेचाळीस साली मोठया हर्षात
अवताराचे कार्य केले सुरुवात । दर्शनासाठी भाविक येत
जो जो रे बाळा जो ।।१३।।
काय देवाच्या मनात आले । गोरेगांव नगर सोडले
मुर्तिजापुरी शहरी आले । पुंडलिक नगर प्रख्यात झाले

Shri Pundlik Maharaj Prasann

**जो जो रे बाळा जो ।।१४।।**
**किती गाऊ तुझी अगाध महिमा । अल्पाज्ञानी वीसरली सीमा**
**दास अजाब गातो पाळणा । शरण आलो खंडू नंदना**
**जो जो रे बाळा जो ।।१५।।**

## येरे येरे भक्त वत्सला

येरे येरे भक्त वत्सला,मंजुळेच्या तुं बाळा
आठवण करीतां कंठ सोकला,त्वरित यावे वेल्हाळा ॥धृ॥
कोठे रमला कोठे गमला,दहीदुधाच्या माठाला
भक्त इकडे वात पाहती,दरबार तुजा सुन्न पडला
येरे येरे भक्त वत्सला ............

आमची गत वा कैसी झाली,हरणी चुकली पाडसाला
हंबर्डा फोडूनी शोधूनी लावा,जवळ करा या वत्साला
येरे येरे भक्त वत्सला...........

अर्जूनाचे घोडे जुंपले,पुंडलिक नामे अवतरला
वेड्या पिश्याचे सोंग घेऊनी,ओळख ना दे कुणाला
येरे येरे भक्त वत्सला...........

'अभिमानदास' शरणागत पुंडलिक या योग्याला
फुला पुष्पांच्या गुंफूनी माला,घालु तुमच्या हो गळा
येरे येरे भक्त वत्सला...........

## श्री.मुंगसाजी देवाची आरती

**जय देव जय देव जय मुंगसाजी नाथा ।**
**आरती ओवाळु तुजला समर्था ।।धु।।**
**जयदेव जयदेव जय मुंगसाजीनाथा**

Shri Pundlik Maharaj Prasann

आंघ कुळी प्रभु प्रगटला अवनी
त्रिविध तापे जन पोळे ते नयनी
देखोनिया झाला खिन्न स्वमनी
उध्दारुनी ठाव देशी तु चरणी ।।१।।
जयदेव जयदेव जय मुंगसाजी नाथा
प्रथम उग्ररुपे तपा विंदान
व्दादश वर्षे पुर्ण मांडीयेले जाण
राहीला उपवाशी अन्ना वाचुन
केले तप अती प्रखर दारुण ।।२।।
जयदेव जयदेव जय मुंगसाजी नाथा
मांडीलये आसन गढीत निर्वाणी
व्याघ्र सर्व विंचु असती ज्या स्थानी
त्रिकुट शिखरावर मग आरदुनी
दशवे व्दारी मन राहे गुंगोनी ।।३।।
जयदेव जयदेव जय मुंगसाजी नाथा
येवुनिया खल अती त्रास देती
आनोनिया विष तुजला पाजीती
परी तू शत्रु मित्र गमले समचिती
श्रीहरी पदकमला ठेवुनी प्रीती ।।४।।
जयदेव जयदेव जय मुंगसाजी नाथा
ऐशा परी व्याधी साहुनी सांगे
जडजीता उध्दरिले सन्मार्गे
शरणांगत धोगला वरदान मागे
सर्व काळ ठेवी मजला तव संगे ।।५।।
जयदेव जयदेव जय मंगसाजी नाथा

## आरती श्री सद्‌गुरु राजाची

श्री भगवान मुंगसाजी महाराज की जय ।
श्री भगवान पुंडलीक महाराज की जय ।
आरती जय सद्‌गुरु राजा । रखा दासन के शिर पंज्या ।।धृ।।
कठिण भवजाल रची माया । किसीको भेद नही पाया ।।

Shri Pundlik Maharaj Prasann

ज्याले मे जिव को लटकाया । हजारो मारमार खाया ।
पार नही हुई किसकी नैय्या । डुब गये सब इसी मे भैय्या ।।
स्थानसे जिसको भरमाया । नर्क बिच यम धरको लाया ।
देखकर हाल जिवो के थे । लिये अवतार जिमी आये ।
बताकरसारं । करे भवपार । सभा नंरनार ।
लुटहरे सरगम की मौजा , रखा दासन के सिर पंज्या ।।१।।
रखी जरुरी नही साधनही । तपस्या नही होना बलकी ।
गरज नही रुपयो लाखनकी । अमीर उमराव फकिरनकी ।
छिपी ज्याद है नही जनकी । लगा लेते है लव मन की ।
धन्य महिमा यह पावन की । दिन भवपार लगावनकी ।
दयाधन समरथ है दाता । तुम्ही दुनिया मे गुरुनाथा ।
कियो बडा काज । हमारी आज । रखा लियो लाज ।
भगा दियो जमगर की फौज्या । रखा दासनके शिर पंज्या ।।२।।
ब्रम्हा विष्णु सदाशिव ये । अंत निगमानिगम नही पावे ।
शरण सुर मुनि गण ऋषि आये । तुम्हारे दिल मे गुण गावे ।
तु ही सब कर्ता कहलाये । शरण चरणो में लिपटाये ।
मनोरथ यह मन मे भावे । कभी सद्‌गुरु दर्शन देवे ।
कहा है वेद नें भी ये सार । सभी का सद्‌गुरु है आधार ।
पाकर नरपाव । धराकर भाव । मस्त हो ज्याव ।
देव नही वहिके बिनदुजा । रखा दासन के शिर पंज्या ।।३।।
धरा यह सुंदर अवतारा । महिमा बहु अपंरपारा ।
सभा मे ही सबसे न्यारा । मिटाते भक्तन ही पिडा ।
दिखाकर निजरुपी उजियारा । वसंत अवधुत दशमव्दारा ।
करमकार मटका घर फोडा । जिव के बंधनको तोडा ।
मिलायो निजरुप दासनको । बिराजे प्रभु सिंहासनको ।
घोगलादास लगी दिल आंस । सदा रख पास ।
आरती करु धुप दिप पुज्या । रखीदासन के शिर पंज्या ।।४।।

Shri Pundlik Maharaj Prasann

## आरती खंडुजी नानांची

आरती खंडुजी नानांची श्री गुरु पुंडलिक पितयाची।।
प्रपंच साधुनी परमार्थ , यशस्वी जाहला यतार्थ ।
परि मुंगसाजी कृपासाथ , स्वरुपी रंगले गुरुनाथ
विसरले भान , लागले ध्यान , जपे भगवान ।
विदेही वृतीदिसे साची ।।१।। आरती खंडुजी नानांची
असे हे निर्विकारी संत,तयाचा कुणा कळे अंत ।
ओळखत कुणा न देतात ,अनुभवी भक्त सांगतात
असे हे भगवंत , कळेना अंत ।
साक्ष ही सर्व सेवकांची ।।२।। आरती खंडुजी नानांची
खंडुजी अन मंजुळा आई, तयाची नितांत पुण्याई ।।
त्यांचे मुळेच आपणाशी, लाभले पुंडलिक ऋषिकेशी
व ंदुनी चरण , भव भय हरण, म्हणुनी शरण ।
पातलो पातोंड भवनाशी ।।३।। आरती खंडुजी नानांची

## ओढ दर्शनाची

(चाल - पाऊले चालती पंढरीची चाल)
मनी ओढ लागे संत दर्शनाची ।
अनाथाचा नाथ प्रभु पुंडलिकाची ।।धृ ।।
पुंडलिक नाथ माऊली जगाची
सावली सुखाची दिन भाविकांची ।।१।।
मनी ओढ लागे .......
सोयरा सखा तो देव भगवान
लाभे समाधान धन्यता जीवाची ।।२।।
मनी आहे लागे.....
उच्च निच कोणी नाही भेद भाव
घेता अनुभव तृप्ती मनाची ।।३।।
मनी ओढ लागे....

Shri Pundlik Maharaj Prasann

प्रभु पुंडलिक समाधीत राहे
वाट तोही पाहे निज साधकाची ।।४।।
मनी ओढ लागे
अजाबदास गायी गीत गौरवाचे
जीवन सुखाचे स्वानुभव हाची ।।५।।
मनी ओढ लागे.......

## चित्त पुंडलिक भेटी...

देहु आळंदीची माती,गोरेगावात जागली ।
इंद्रायणीच्या ओठांनी, काटेपूर्णा उद्गारली ।।धृ ।।
माय देवकीची कुस,आज उजवली पुन्हा ।
पुंडलिकाच्या रुपाने, आला गोकुळात कान्हा ।।१।।
लिला अगाध कृष्णाच्या, खेळ गड्यांच्या संगती ।
लाखो डोळयांनी पाहिल्या, गोरेगाव आसमंती ।।२।।
भक्त होऊनिया दंग, चाले अखंड सोहळा ।
काटेपुर्णा वाळवंटी, लागे पंढरीचा डोळया ।।३।।
माया मोहपाशातून,जीव सोडून मोकाट ।
दु:खी जगा दाखविली, खरी जिवनाची वाट ।।४।।
सुख दु:खाचे जीवन, अर्ध्य वाहे चरणासी
द्यावे दान पुंडलिका, चित्त तुझे पायरीशी ।।५।।

-म.अु.धरदेव,अमरावती

## पुंडलिका भेटी...

(चाल -आयी बरखा बहार....बरखा)।
चैन पडेना जीवा,प्रभू रुप दाखवा ।
पुंडलिक देवा,भेट द्या भेट द्या ।। धृ ।।
दिशा हिन झालो, वाट गवसेना ।
असुनी डोळे,काही दिसेना ।
शरीरी नाही उरला प्राण ।

Shri Pundlik Maharaj Prasann

जीव हा झालासे हैराण ।
दीन दुःखीतांचे भगवान ।।१।।
चैन पडेना जीवा....
असे न्यारं, न्यारं, दुःख अपार ।
आता सोसवेना, संसार भार ।
येवू द्या हो दया माया ।
घालितो लोटांगण पाया ।
जीवन जाईल हे वाया ।।२।।
चैन पडेना जीवा....
पुंडलिका भेटी मन हे अधीर ।
पावन समाधी, देईल धीर ।
अस मनी वाटे तो विश्वास ।
करावी पूर्ण मनीची आस ।
अजाबदासा देई उल्हास ।।३।।
चैन पडेना जीवा.....
- अजाबदास

## श्री.बाबांची ओळख संतांच्या शब्दात....

(चाल -ऐ पडदा हटा दो
पुंडलिक बाबा कोण ? पुंडलिक बाबा कोण?
संतांच्या शब्दात ऐकू या ओळख यांची जाण ।। धृ।।
परमहंस मुंगसाजी नांदले, धामणगावंमाजी ।
पिता खंडूजी पुसे तयाहा कोण, वेडा पाजी ।
तो देव वेडा तुचं हे उत्तर जेव्हा देत ।
ब्रम्हा वेड नानास लागले त्याच घडी पासुन ।।१।।
गोरेगावी आले असता संग गाडगे बाबा ।
खंडूनाना पुसे तया हो कोण वेडा सांगा ।
तो वेडा नाही राज भगवंत पोटी तुझ्या ।
घेई काळजी याची गडया तू खरच भाग्यवान ।।३।।
संत लहानु बाबा म्हणे हे संताचे युवराज ।
ईश्वर शक्ती म्हणून वदले तुकडोजी महाराज ।

Shri Pundlik Maharaj Prasann

तुम्हा पाहावया देव ते क्षेत्र गोरेगांव ।
लोधी खडचे संत देवमण  सांगे जनालागून ।।३।।
परशराम बाबांनी म्हटले पुंडलिक आत्मा माझा ।
आराध्य दैवत माझे वदले ऐसे विक्तु बाबा ।
काटोलचे गुलाब बाबा  म्हणे राम हाच माझा ।
शरणागत श्रीराम वंदीतो सद्‌गुरुचे चरण  ।।४।।

-कवि - श्री सदाफळे गुरजी

## ओवी

संता पायी नमन, घालीते लोटांगण
ओवी तुझी गाईन, तु येरे बा पुंडलिका ।।१।।
काटेपुर्णाच्या तीरी, अवतरला भुवरी
गोरेगांवी श्रीहरी तुं येरे बा पुंडलिका ।।२।।
खंडूजीची पुण्याई , आली हो  फळाला
मंजुळेच्या बाळा, तुं येरे बा पुंडलिका ।।३।।
चैत्र शुध्द पंचमी,रोहीणी नक्षत्राशी
जन्मला ऋषीकेशी, तुं येरे बा पुंडलिका ।।४।।
काटेपूर्णा वाळवंटी, खेळ मांडीयला रे
बालरुप गोजीरे, तुं येरे बा पुंडलिका ।।५।।
मुंगसाजी माऊलीने, कृपांकित केले
भक्त दर्शनी आले, तुं येरे बा पुंडलिका ।।६।।
उध्दारीले सज्जन, दु:खी कष्टी तो दीन
ना कोणी तुझ्या विन, तुं येरे बा पुंडलिका ।।७।।
सगुन निर्गुण,रुप ते पाहिन
श्रध्दा चरणी वाहीन, तुं येरे बा पुंडलिका ।।८।।
पुंडलिक नामाचा, लागलासे ध्यास
पुरवावी ती आस, तुं येरे बा पुंडलिका ।।९।।
अजाबदास संगतीन, गंगाधर गाईन

Shri Pundlik Maharaj Prasann

धन्य होईल जीवन, तुं येरे बा पुंडलिका ।।१०।।

कवि -अजाबदास

## प्रार्थना

आता शेवटी मागणे चरणी हे आहे झणी दे मला ।
जावो नि मना पदा वरोनिया ही लाज माझी तुला ।
गावो गुण तुझे , बघो रुप तुझे , गोडी तुझी दे भली ।
या लागी तुजला आता शरण मी आलो गुरु माउुली ।।१ ।।
श्री सद्‌गुरुनाथा पुंडलिक मुनी गोपाल संता नमो ।
अडकुजी बदरी अनंत किसना श्रीराम कृष्णा नमो ।
मुंगसाजी भगवान सांप्रत समही त्या देव देवा नमो ।।२ ।।
केजाजी बदरी खटेश्वर गजा सिध्देश्वरा भारती ।
बंस्वामी मनीराम अडकोजी झिंगु बेंडोजी अवतारीती ।
मौलाजी मलकोजी डेबुजी अहा मुंगसाजी योगी मला ।
लाला लष्करी ताजुद्दीन फकिरजीगोंविद स्मरे घोगला ।।३ ।।

## नमस्कार

प्रभो मायबापा समर्था दयाळा । अगम्य तुझी थोर आहेची लिला
करोनी दया तारशी सेवकाला । नमस्कार माझा
श्री भगवान पुंडलिकाला ।।१।।
माता मंजुळा ज्यांची असे हो । खंडुजी नामे पिता असे हो
गोरंगांवात अवतार झाला । नमस्कार माझा...।।२।।
सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षु नको गुणवंता आता । रघुनायका मागणे हेचि आता।।३।।
उपासणेला दृढ चालवावे । भूदेव संतास सदा नमावे ।
सत्कर्म योगे वय घालवावे । सर्वांमुखी मंगल बोलवावे ।।४।।
ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे । त्या त्या ठिकाणी निजरुप तुझे
मीठेवितो मस्तक ज्या ठिकाणी । तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही ।।५।।

Shri Pundlik Maharaj Prasann

## पुष्पांजली

पुष्पांजली ही तुम्हा अर्पितो मंजुळातनया ॥
तव पदीवंदन करण्या स्फूर्ति द्यावी या हृदया॥१॥
तुळशी बेल आणि फुले सुवासिक नाना विधीमाला ॥
अर्पितसे बहु प्रेम भरे आम्ही श्री प्रभुपदकमला ॥२॥
किंचित सेवा भजन पुजन हे घडले तव चरणी ॥
गोड करुन घ्या प्रेमे आमुची भक्तांची करणी ॥३॥
दिन दयाळा भक्त वत्सला शरण तुम्हा आलो ॥
उध्दरण्या आम्हा पापी जनाला भवडोई बुडलो ॥४॥

## कर्पुरारती

कर्पुरगौरम करुणावतार
संसारसारं भुजगेंद्रहारम ।
सदावसंतम हृदयारविंदे
भवंभवानी सहितं नमामी ॥
मंदारमाला कपालकाया
कपालकाया कितशेखराये ।
दिगोबरायेच दिगंबराय
नमो शिवायच नम:शिवाय ॥

**ॐ बह्मानंद परमसुखदं केवल ज्ञान मुर्तिम**
**द्रंव्दातित गगनसदृश्यम तत्वपत्सदि लक्षम ।।**
**एक नित्यं विमलमचलं सर्वाधिसाक्ष भूतम ।**
**भावातितं त्रिगुण रहित सद्गुरु तन्नमामि ।।**
**ॐशांती । शांती।। शांती।।।**
**।। पुंडलिक महाराज की जय ।।**

**पुंडलिका धाव लवकरी ।**
**आपुल्या भक्ताला तारी ।।**

Shri Pundlik Maharaj Prasann

Shri Pundlik Maharaj Prasann